# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.07.2024** **वार – सोमवार**

---

**मुरलीधर मोहोळ**

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नवं टर्मिनल, येत्या रविवारी म्हणजेच 14 जुलै रोजी सुरू होईल, अशी माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज दिली. हे नवं टर्मिनल सुरू करण्यासाठी सीआयएसएफच्या अतिरिक्त जवानांची आवश्यकता होती. यासाठी मोहोळ यांनी पाठपुरावा केला होता. त्याला परवानगी मिळून सीआयएसएफचे जवान पुणे विमानतळावर दाखलही झाले आहेत. त्यानंतर आता तांत्रिक प्रक्रियाही पूर्णत्वाला जात आहे. नवं टर्मिनल सुरु झाल्यानंतर पुणेकर प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असल्याचं मोहोळ यांनी म्हटलं आहे.

**धावपट्टी**

दरम्यान पुण्यातील लोहगाव विमानतळावरच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या ओ एल एस सर्वेक्षणालाही आजपासून सुरुवात झाली आहे. दिल्लीहून आलेल्या विशेष तज्ज्ञांच्या पथकाद्वारे हे सर्वेक्षण केलं जात असून त्यांचा अहवाल नागरी विमान वाहतूक मंत्रालयाला सादर केला जाणार आहे. मंत्रालयाच्या मान्यतेनंतरच धावपट्टी विस्ताराच्या कामाला प्रत्यक्ष प्रारंभ होईल. पुण्याचे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार या सर्वेक्षण कामासाठी समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत.

**परिसंवाद**

स्त्रिया सर्वार्थानं सक्षम आणि समर्थ आहेत, यशाच्या अनेक वाटा आपली वाट पाहात आहेत, असं मत माजी परराष्ट्र राज्यमंत्री मीनाक्षी लेखी यांनी नुकतंच पुण्यात व्यक्त केलं. पूना वुमेन्स काऊन्सिलच्या शताब्दी वर्षानिमित्त, महिला सक्षमीकरण या विषयावरील परिसंवादात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या.

**रेल्वे रद्द**

मुंबईत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे रेल्वे मार्गावर पाणी साठल्याने अनेक रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या डेक्कन क्वीन, प्रगती एक्स्प्रेस, इंटरसिटी, इंद्रायणी एक्स्प्रेस या गाड्याही रद्द करण्यात आल्या असल्याचं मध्य रेल्वेने कळवलं आहे.

**मोहरम**

मुस्लिम धर्मियांच्या मोहरमच्या महिन्याला आजपासून सुरुवात झाली. मोरहमच्या महिन्यापासून इस्लामिक नवीन वर्षाचीही सुरवात होते. यानिमित्ताने पुण्याच्या सीरत कमिटीनं मुस्लिम धर्मियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**अपघात विमा**

पुणे महापालिकेत काम करणाऱ्या जवळपास आठ हजाराहून अधिक कंत्राटी कामगारांसाठी सुमारे 15 लाख रुपयांचा अपघाती विमा उतरवला जाणार आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांकडून 265 रुपये 50 पैसे घेतले जाणार आहेत, अशी माहिती महापालिकेचे मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे यांनी दिली. महापालिकेच्या कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांसाठी ही योजना होती; आता कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी देखील ही सुविधा सुरू होणार आहे.

**उपोषण**

समग्र शिक्षा अभियानातील 218 दिव्यांग विशेष शिक्षकांचं समायोजन करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य दृष्टीहीन संघातर्फे पुणे शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर आजपासून आमरण उपोषण सुरू करण्यात आलं आहे. मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवणार असल्याचं संघटनेनं दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**हीट अँड रन**

पुण्यात काल रात्री दोन वेगवेगळ्या अपघातात दोन पोलिस हवालदारांचा मृत्यू झाला तर एक पोलिस हवालदार जखमी झाला. पहिला अपघात पुणे मुंबई जुन्या महामार्गावर हॅरिस पुलाखाली रात्री पावणे दोन वाजता झाला. रात्रीची गस्त घालण्यासाठी दुचाकीवरुन निघालेल्या दोन पोलिसांना पाठीमागून आलेल्या चारचाकी वाहनाने धडक दिली. अपघातानंतर वाहनचालक वाहनासह फरार झाला. या अपघातात समाधान कोळी यांचा मृत्यू झाला. तर पी सी शिंदे जखमी झाले. तर दुसऱ्या प्रकरणात पुण्यातील राज्य गुन्हे अन्वेषण विभागात काम करणारे हवालदार सचिन माने यांचा मृत्यू झाला. सचिन माने पिंपळे सौदागर भागातून दुचाकीवरुन निघाले असताना आज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत त्यांचा मृत्यू झाला.

**क्रीडा**

क्यु क्लचर अजिंक्यपद सिक्स् रेड स्नुकर स्पर्धा सध्या पुण्यात सुरू आहे; यात राज्यातून 128 खेळाडू सहभागी झाले आहेत. शिवम अरोरा, आरव संचेती, तहा खान, विनीत रणपिसे, पिनाक अनाप आणि वैभव मालखेडे या खेळाडूंनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश केला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज जोरदार पाऊस पडला. उद्याही शहरात हलक्या ते मध्यम पावसाची तर घाटमाथ्यावर मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे. दरम्यान जिल्ह्याच्या विविध भागात सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळं खडकवासला धरण प्रकल्पातील चारही धरणांतील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. यंदाच्या हंगामात काल प्रथमच गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा पाणीसाठा किंचितसा वाढल्याची नोंद झाली. गेल्या वर्षी 7 जुलै रोजी खडकवासला धरण प्रकल्पात सुमारे 22 टक्के पाणी होते, तर यंदा 22 टक्क्याहूं थोडं जास्त पाणीसाठा आहे. येत्या आठवडयात जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवण्यात आली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**